# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर.
## (शिक्षण विभाग)

जा.क्र.4570/शि.वि./२०१५ दि.9/०७/२०१५

प्रति,

देयक लिपीक,
झोन क्र.१ ते १०,
शिक्षण विभाग, मनपा, नागपूर.

**विषय :- राष्ट्रीय मतदार यादया शुध्दीकरण व प्रमाणिकरण कार्यक्रम अंमलबजावणी अंतर्गत कर्मचाऱ्यांच्या/ शिक्षकांच्या मतदार ओळखपत्राशी आधार कार्ड क्रमांक संलग्न करण्याबाबत.**

संदर्भ - १. मा.मुख्य निवडणूक अधिकारी, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र.ईएलआर २०१५/प्रक्र.१४०/१५/३३, दि.१७.०३.२०१५.
२. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, नागपूर क्र.निवडणूक-२/कार्या-३/कावि४२३/ २०१५, दि.१५.०६.२०१५
३. सामान्य प्रशासन विभाग, मनपा, नागपूर यांचे परिपत्रक क्र.साप्रवि/१६/परि, दि.०६.०७.१५ अन्वये.

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये बोगस मतदार शोधण्यासाठी, मतदार यादया शुध्दीकरण व प्रमाणिकरण कार्यक्रम राबविण्याचे शासनाने ठरविले आहे. त्या अंतर्गत मतदार यादी आधार कार्ड शी जोडण्यात येत आहे. त्या अनुषंगाने छायांकित मतदार ओळखपत्र (Epic Card) UIDAI च्या आधार कार्ड क्रमांकाशी जोडण्याकरीता सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील अर्जासोबत Voter ID No. व आधार कार्ड यांची प्रत मतदार यादी नोंदणी अधिकारी यांचे कार्यालय, मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) तसेच मतदार मदत केंद्र ला सादर करावयाचा आहे.

सदर कार्यक्रम हा राष्ट्रीय कार्यक्रम असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता तत्परतेने कार्य करून घेणे अपेक्षीत आहे. याकरीता आपण वेतन काढत असलेल्या शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या संख्येऐवढे नमुना अर्ज शिक्षण विभागातून प्राप्त करून घ्यावे व संबंधित शिक्षक/कर्मचाऱ्यांना वितरीत करून अर्जातील संपूर्ण माहिती भरून Voter ID No. व आधार कार्ड यांची प्रत जोडून शिक्षण विभाग कार्यालयात सहा.अधिक्षक यांचेकडे दि.१२.०७.२०१५ पर्यंत खाली दिलेल्या नमुन्यातील माहितीसह सादर करावे.

| अ.क्र. | अधिनस्थ शिक्षक व कर्मचारी यांची संख्या | छायाचित्र मतदार ओळखपत्र (EPIC) कार्ड क्रमांकाशी जोडलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|
| | | |

प्रस्तुत कार्यक्रम कालमयदितील व अनिवार्य असल्यामुळे आपलेकडील सर्व शिक्षक/कर्मचाऱ्यांचे मतदार ओळखपत्रासोबत आधार कार्डचे संलग्नीकरण होणे आवश्यक आहे, याची नोंद घेवून प्रस्तुत कार्य काळजीपूर्वक करण्याची दक्षता घ्यावी.

**टिप** - ज्या शिक्षक/कर्मचाऱ्यांनी यापूर्वीच मतदार ओळखपत्रासोबत आधार कार्डचे संलग्नीकरण केलेले आहे, त्यांची फक्त माहिती घेवून उपरोक्त तक्त्यात भरावी.

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी,**

१. सहा.अधिक्षक, शिक्षण विभाग यांनी झोन क्र.१ते१० चे सर्व देयक लिपीकांशी समन्वय साधून त्यांचेकडून दि.१२.०७.२०१५ पर्यंत विहीत नमुन्यातील सर्व अर्ज व उपरोक्त पत्रात नमुद तक्त्यातील माहिती प्राप्त करून घ्यावी.
२. सर्व शाळा निरीक्षक, झोन क्र.१ ते १०, यांनी स्वत: लक्ष घालून देयक लिपीकांमार्फत व मुख्याध्यापकांमार्फत प्रस्तुत कार्य पुर्ण करून घेण्याबाबत.

३. सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका, प्राथ./उच्च प्राथ./माध्य.शाळा, मनपा, नागपूर
यांनी त्वरीत आपले अधिनस्थ सर्व शिक्षक/कर्मचाऱ्यांसह देयक लिपीकांशी संपर्क साधून मतदार ओळखपत्रासोबत आधार कार्डचे संलग्नीकरण करण्यासाठी देण्यात येणारे अर्ज प्राप्त करून दि.११.०७.२०१५ पर्यंत झोन कार्यालयात देयक लिपीकांकडे जमा करावे. प्रस्तुत कार्य शासकीय व कालमर्यादितील असून यात हयगय केल्यास जबाबदार पकडून कार्यालयीन कारवाई करण्यात येईल,याची नोंद घ्यावी. ज्या शिक्षक/कर्मचाऱ्यांनी यापूर्वीच हे कार्य पुर्ण केले असल्यास त्यांनी फक्त याबाबत माहिती देयक लिपीकांना दयावी, जेणेकरून कार्याची पुनरावृत्ती होणार नाही.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर